इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This Booklet contains **20** printed pages.

www.prepp.in

# MVD18–I

परीक्षा पुस्तिका संख्या
Test Booklet No.

Prepp
Your Personal Exams Guide

LANG. CODE
**11**

## प्रश्न-पत्र—I / PAPER—I
## मराठी भाषा परिशिष्ट / MARATHI LANGUAGE SUPPLEMENT
## भाग IV & V / PART IV & V

परीक्षा पुस्तिका संकेत
**Test Booklet Code**

**I**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**

**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ संख्या 20) पर दिए गए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page No. 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका के पृष्ठ संख्या 2 व 19 देखें।**
**For Instructions in Marathi, see Page Nos. 2 and 19 of this Booklet.**

### *परीक्षार्थियों के लिए निर्देश :*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका का एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग—IV (भाषा—I) **या** भाग—V (भाषा—II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेजी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग—IV व भाग—V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर-पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉलपॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत I** है। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका का संकेत, उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं तथा प्रत्येक 1 अंक का है :

   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्रश्न सं० 91–120)
   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्रश्न सं० 121–150)
7. भाग—IV में भाषा—I के लिए 30 प्रश्न और भाग—V में भाषा—II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा—I और/या भाषा—II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है/हैं, तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लें। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन-पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग—V (भाषा—II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा—I (भाग—IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ़ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर-पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

### *Instructions for Candidates :*

1. This Booklet is a Supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part—IV (Language—I) **OR** Part—V (Language—II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part—IV and Part—V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ballpoint Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **I**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **Two** Parts, IV and V, consisting of **60** Objective-type Questions and each carrying 1 mark :

   Part—IV : Language—I (Marathi) (Q. Nos. 91–120)
   Part—V : Language—II (Marathi) (Q. Nos. 121–150)
7. Part—IV contains 30 questions for Language—I and Part—V contains 30 questions for Language—II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi Language have been given. **In case, the language(s) you have opted for as Language—I and/or Language—II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part—V (Language—II) in a language other than the one chosen as Language—I (Part—IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ______________________
Name of the Candidate (in Capital letters)

अनुक्रमांक (अंकों में) : ______________________
Roll Number (in figures)

(शब्दों में) : ______________________
(in words)

परीक्षा-केन्द्र (बड़े अक्षरों में) : ______________________
Centre of Examination (in Capital letters)

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ______________ निरीक्षक के हस्ताक्षर : ______________
Candidate's Signature Invigilator's Signature

Facsimile Signature Stamp of Centre Superintendent ______________________

ही पुस्तिका 20 पानांची आहे.

www.prepp.in

LANG. CODE
**11**

# MVD18–I

चाचणी पुस्तिका कोड

Prepp Your Personal Exams Guide

## प्रश्नपत्रिका—I

## मराठी भाषा पुरवणी

## भाग—IV आणि V

ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.

या पुस्तिकेच्या मलपृष्ठ क्रमांक 19 आणि 20 वरील सूचना काळजीपूर्वक वाचा.

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी-पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग—IV (भाषा—I) **किंवा** भाग—V (भाषा—II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी-पुस्तिकेतील भाग—I, भाग—II आणि भाग— III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग—IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग—IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी-पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे किंवा निळे बॉलपॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड I** आहे. उत्तर-पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून घ्यावी.
6. या चाचणी-पुस्तिकेत—IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्र. सं. 91 ते 120)

   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्र. सं. 121 ते 150)
7. भाग—IV मध्ये भाषा—I साठी **30** प्रश्न आहेत आणि भाग—V मध्ये भाषा—II साठी **30** प्रश्न आहेत. या चाचणी-पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा—I व/वा भाषा—II साठी निवडलेली भाषा मराठीपेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी-पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग—V (भाषा—II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा—I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी-पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक (अंकांमध्ये) : ______________________

(शब्दांमध्ये) : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of Centre Superintendent ______________________

परीक्षार्थींनी **भाषा–I** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **(प्रश्न क्रमांक 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part–IV (Q. Nos. 91–120)**, if they have opted **MARATHI** as **Language–I** only.

# Part—IV / भाग—IV

# Language—I / भाषा—I

## Marathi / मराठी

Prepp
Your Personal Exams Gu

परीक्षार्थींनी **भाषा–I** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **(प्रश्न क्रमांक 91–120)** यांची उत्तरे द्यावीत.

***सूचना*** : योग्य पर्यायाची निवड करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या (प्रश्न क्रमांक **91** ते **105**) :

**91.** विद्यार्थ्यांना जेव्हा त्यांची शब्दलेखन आणि विरामचिन्हे वापरण्याची क्षमता वाढविण्यासाठी शिकविले जाते. तेव्हा

(1) त्यांच्या आकलन क्षमतेत वाढ होते

(2) त्यांची अचूकता वाढते

(3) त्यांची अस्खलितता सुधारते

(4) त्यांची सर्जनशीलता समृद्ध होते

**92.** भाषेच्या वर्गात वाक्यरचनेचा सराव म्हणजे

(1) विद्यार्थी वैविध्यपूर्ण नमुने अभ्यासतात आणि नेमके उत्तर शोधतात

(2) विद्यार्थ्यांना शिक्षक मदत करतात आणि विविध माध्यमांच्या आधारे ते स्वतःचे सिद्धांत मांडतात

(3) विद्यार्थी सभोवतालच्या जगातून वस्तूंच्या संदर्भात आलेल्या अनुभवांचा भाषिक उपक्रमांमध्ये वापर करतात

(4) विद्यार्थी स्वतः शिक्षण सामग्री तयार करतात आणि स्वानुभवातून ज्ञान प्राप्त करतात

**93.** भारतात प्रादेशिक भाषेच्या विकासासंदर्भात पुढीलपैकी कोणती बाब अडथळा ठरत नाही?

(1) लोकांना ही गोष्ट अपरिचित असणे

(2) पर्याप्त सोयी नसणे

(3) हा मुद्दा न समजणे

(4) भाषांतराच्या अडचणी

**94.** भाषा आकलन (acquisition) म्हणजे

(1) फक्त आवश्यक शब्दांचा वापर करता येणे

(2) मुलांना मातृभाषा नीट येण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे

(3) व्याकरणाच्या विश्लेषणासाठी आणि आकलनासाठी पद्धतशीर दृष्टिकोन स्वीकारणे

(4) मानवी मेंदूच्या जन्मजात क्षमतेमुळे भाषाग्रहणाची प्रक्रिया

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

**95.** एक भाषा शिक्षक लेखनकौशल्य कोणत्या प्रकारे शिकवू शकतो?

(1) द्रुत लेखन (Dictation)

(2) मुलांना सुस्पष्ट लिहायला सांगून

(3) बूद्धीला चालना देणाऱ्या युक्ती वापरुन मुलांना स्वतःच्या शब्दात लिहायला सांगून

(4) मुलांना लहान लेख पाठ करण्यास सांगून

**96.** अस्खलित भाषा क्षमतेत कोणत्या प्रकारे वाढ करता येते?

(1) विद्यार्थ्यांशी संवाद साधून

(2) विद्यार्थ्यांना समजत नसेल तर त्यांना गप्प बसण्यास सांगून

(3) विद्यार्थ्यांनी केलेल्या चुका तिथल्या तिथं सांगून आणि सुधारुन

(4) संभाषणात भाषेचा वापर करण्यासाठी अनुकूल संधी उपलब्ध करुन देऊन

**97.** भाषा शिकविण्यासाठी तयार [illegible] पाठाची सुरुवात ______ या पासून होते.

(1) उद्दिष्टांची यादी तयार करणे

(2) गोषवारा सांगणे आणि विद्यार्थ्यांना कृती करण्यास सांगणे

(3) पाठाचा संदर्भ सांगणे

(4) फळ्यावर लिहिणे

**98.** उपचारात्मक (Remedial) शिक्षण म्हणजे ______ कार्य आहे.

(1) आदेशात्मक

(2) प्रशिक्षण संबंधी

(3) नकारात्मक

(4) सैद्धांतिक

**99.** भाषिक कौशल्ये पुढीलपैकी कोणत्या पद्धतीने शिकविली गेली पाहिजे?

(1) स्पष्ट विवरण देऊन

(2) स्वायत्तपणे

(3) एकत्रितपणे

(4) अनुकरण करायला सांगून

100. भाषेचे उच्चारण शिकताना जर मुलांमध्ये आत्मविश्वास नसेल तर पुढीलपैकी कोणती उपाय योजना परिणाम कारक ठरेल?

(1) वर्गात मोठ्याने वाचणे

(2) मुले एकामेकांशी बोलतील असा एखादा खेळ खेळवणे

(3) चुकांना त्या त्या वेकी दुरुस्त करणे

(4) भाषा तज्ज्ञाची मदत घेऊन विशिष्ट कृती करणे

101. प्रश्नपत्रिका तयार केल्यानंतर शिक्षक मूल्यमापनाच्या धोरणांना तपासून पाहतात. म्हणजे शिक्षक प्रश्न-पत्रिकेच्या कोणत्या घटकाचे पुनरावलोकन करतात?

(1) विषयवस्तूचा व्याप

(2) प्रश्नांचे प्रकार

(3) विश्वासार्हता

(4) वैधता

102. पुढीलपैकी कोणती बाब वाचन अक्षमता ठरत नाही?

(1) अक्षर आणि शब्द न ओळखता येणे

(2) वर्ण विन्यासात सातत्यता नसणे

(3) वाचनाची गती आणि उच्चार

(4) शब्द आणि विचारांची समज

103. भाषेच्या प्रकृतीच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) प्रत्येक भाषेची आपली स्वत:ची संरचना असते

(2) भाषेचा संबंध संस्कृती आणि सभ्यतेशी असतो

(3) भाषेचा प्रवास सहजतेकडून गुंतागुंतीकडे असतो

(4) भाषेचा प्रवास संयोगाकडून विश्लेषणाकडे असतो

104. वर्गातील पुढीलपैकी कोणता उपक्रम मौखिक भाषा विकासास उपयोगी ठरेल?

(1) पुस्तकातील गोष्ट शिक्षकांसोबत सामूहिकपणे वाचणे

(2) शब्दांचे योग्य उच्चार सामूहिकपणे म्हणणे

(3) कविता पाठ करणे आणि एकेकाने म्हणणे

(4) आवडलेल्या कथेतील पात्रांचा अभिनय करणे

105. जलद वाचनाचे उद्दिष्ट कोणते?

(1) आवड निर्माण करणे

(2) विशिष्ट माहिती मिळविणे

(3) विस्तृत वाचन

(4) माहिती मिळविणे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide

*सूचना* : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **106** ते **114** साठी योग्य पर्यायांची निवड करा :

www.prepp.in

रविवारचा दिवस कधी येतो असे मला व रुप्याला होई. खास करून आमच्या खालच्या आळीचा आठवडा बाजार सकाळपासून दुपारपर्यंत फिरत रहायला आम्हाला फारच आवडायचे. त्या बाजारात लाल आईसफ्रूटच्या गाड्या असत, ताजी मासळी, कांदे-बटाटे, भाजीची दुकाने असत. लोकांकडे पाहात पाहात फिरणे हा आमचा विशेष छंद असे. कधीतरी गारुड्याचा खेळ बधण्यात वेळ जाई. दादा मात्र त्याचा अभ्यास करी. त्याला उगाच इकडे-तिकडे फिरत फिदीफिदी हसायला आवडत नसे. संध्याकाळी त्रिविक्रमाच्या देवळात आम्ही 'विषामृत', 'खांबखांब खांबोळी', 'डबा ऐसपैस', सारखे खेळ खेळायचो. नाहीतर रानावनात भटकून करवंदे, अटके, तोरणे, अळू खात आमचा रविवार जाई. करवंदे नसतील तेव्हां त्या झाडाचे कोवळे-कोवळे अंकूर आम्ही सोलून खायचो. त्याच्या पानाच्या पेपाट्या करत एकमेकांच्या कानात पे पे वाजवायचो. यातही दादा कधीतरीच असायचा. तो नसला तरी आम्ही मात्र रविवारी फार हुंदडण्यात घालवत असू. थोडक्यात रविवार कधी एकदा येतो त्याची आम्ही वाट बघायचो. अचानक आमच्या बाबांची बदली राजापूरला झाली. आणि आमचा रविवार बदलूनच गेला.

राजापूरचे घर भाड्याचे होते. त्या दोन खोल्या व माडी एवढेच होते. अंगणही चिक्कार मोठे नव्हते. पण एक पडवी होती. तेथे झोपाळा होता. त्यावर बसून परवचा, पाढे आणि गाणी म्हणायला आम्हाला आवडायचे. इकडे रानोमाळ भटकता येत नसे. राजापूरच्या नगर परिषदेचे भोंगे ऐकायला मजा वाटे. तो भोंगा सकाळी सहा, दुपारी बारा आणि रात्री नऊला अशा काही वेळेला वाजायचा. सकाळी एक पाववाला ओरडत जाई. चहाचे कप घेऊन आम्ही त्याची वाट बघत बसू. रोज वाट पाहिली तरी बाबा फक्त रविवारीच पाव घेऊन देत असत.

रविवारी पाढे म्हणा असे कोणी म्हटले की मला मळमळते. सारखे वाचन करणे मला आवडन नाही. दादा मात्र आमच्या वाटणीचेही वाचत असतो. कागदाचा कपटा सापडला तरी तो घेऊन वाचत बसणे त्याला आवडते. जेवतानाही पुस्तक मांडीवर घेऊन तो बरेचदा वाचत असे. तो हुशार होता. त्याचे जास्त कौतुक होई म्हणून माझ्या पोटात बरेचदा दुखत असे. त्याला अभ्यास करून कुणी मोठा ऑफिसर व्हायचे होते आणि रुप्याला 'पैलवान' व्हायचे होते. बाईंनी वर्गात एकदा विचारले की तुम्हाला मोठेपणी कोण व्हायचे आहे? मी 'नटी' असे उत्तर दिले. बाईंनी आमच्या घरी येऊन माझे उत्तर सांगितल्यावर आईने माझी पाठ मऊ केली होती.

**106.** लेखिकेला कोणत्या गोष्टीचा विशेष छंद होता?

(1) परवचा म्हणण्याचा

(2) पाढे म्हणण्याचा

(3) लोकांकडे पाहात फिरण्याचा

(4) वाचत बसण्याचा

**107.** 'मळमळणे' म्हणजे नेमके काय?

(1) एखाद्या गोष्टीचा तिटकारा येणे

(2) एखाद्या गोष्टीचे अप्रूप वाटणे

(3) एखादा पदार्थ कुस्करणे

(4) एखाद्या गोष्टीची भिती वाटणे

**108.** 'हुंदडणे' या शब्दाचा विरुद्धार्थी आशय असलेला पर्याय शोधा

(1) धुडगूस घालणे

(2) शिस्तीने वागणे

(3) धिंगाणा करणे

(4) आरडा-ओरड करणे

**109.** लेखिकेच्या परिसरातील आठवडा बाजारात पुढीलपैकी कोणती गोष्ट मिळत नसे?

www.prepp.in

(1) कांदे-बटाटे

(2) मासळी

(3) करवंद

(4) भाजी

**110.** 'पाठ मऊ करणे' या वाक्यातून कोणता अर्थ अभिप्रेत आहे?

(1) बदडणे

(2) शाबासी देणे

(3) पाठीशी घालणे

(4) पाठ फिरवणे

**111.** लेखिकेचे पोट कोणत्या कारणास्तव दुखत असे?

(1) आईसफ्रूट खाल्यामुळे

(2) भावाचे कायम कौतुक होत असल्यामुळे

(3) झाडाचे कोवळे अंकूर सोलून खाल्यामुळे

(4) जेवताना पुस्तक वाचल्यामुळे

**112.** 'दादा'ला पुढीलपैकी कोणती गोष्ट आवडत आहे?

Prepp
Your Personal Exams Gu

(1) फिदीफिदी हसणे

(2) पानाच्या पेपाट्या वाजवणे

(3) परवचा म्हणजे

(4) पुस्तक वाचणे

**113.** लेखिकेच्या जगण्यातील एका विशिष्ट दिवसाचा जीवनक्रम कोणत्या कारणास्तव बदलून गेला?

(1) गारुड्याचा खेळ बघितल्यामुळे

(2) बाबांची परगावात बदली झाल्यामुळे

(3) नगर परिषदेचे भोंगे ऐकायला मिळाल्यामुळे

(4) त्रिविक्रमाच्या देवळात गेल्यामुळे

**114.** "तेथे झोपाळा होता. त्यावर बसून परवचा. पाढे आणि गाणी म्हणायला आम्हाला आवडायचे." दिलेल्या पर्यायातून या वाक्यातील सर्वनाम शोधा.

(1) बसून

(2) परवचा

(3) आम्हाला

(4) आवडायचे

*सूचना* : पुढील पद्यांश वाचा आणि प्रश्न क्रमांक **115** ते **120** साठी योग्य पर्यायांची निवड करा :

www.prepp.in

माय माझी कष्टकरी, तिची सांगतो कहाणी.
बापासंगे राबते ती, बारोमास काळ्या रानी !

उन पावसाची तिला, नसतेच कधी पर्वा
डोळ्यांमध्ये सदा तिच्या, बहरे ऋतू हिरवा !

राबताना विसरते, तिचा संसार फाटका
चार घास खाते जेव्हा, होतो उनाचा चटका !

मायबाप राबतात, होऊनिया जेव्हा दंग
माय भासते रुक्मिणी, अन् बाप पांडुरंग !

सुखाकरिता आमच्या, धडपडे तिचा श्वास
तिच्या घामाला येतो, अबीर बुक्क्याचा वास !

**115.** 'प्रयत्न' या शब्दाचा समानार्था शब्द सुचवा

(1) धडपड

(2) धडधड

(3) धपाटा

(4) दणकट

**116.** माय'च्या नजरेतून कवीला कशाचे दर्शन घडते?

(1) काळे रान

(2) उत्कर्षाचा काळ

(3) ऊनपाऊस

(4) अश्रू

**117.** 'दंग' शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द शोधा

Prepp
Your Personal Exams Gu

(1) निमग्न

(2) गर्क

(3) गुंग

(4) दंभ

**118.** कवीने कवितेत प्रामुख्याने कशाचे गुणवर्णन केले आहे?

(1) हिरव्या ऋतूचे

(2) शेत जमिनीचे

(3) आईचे

(4) रुक्मिणी पांडुरंगाचे

**119.** माय'ला कोणत्या गोष्टीची काळजी नसते?

(1) चार घास खाण्याची

(2) ऊन पावसाची

(3) अबीर-बुक्क्याची

(4) काळ्या रानाची

**120.** कष्ट करताना माय'ला कोणत्या गोष्टीचा विसर पडतो?

(1) फाटका संसार

(2) ऋतु हिरवा

(3) रुक्मिणी

(4) पांडुरंग

परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part–V (Q. Nos. 121–150)**, if they have opted **MARATHI** as **Language–II** only.

# Part—V / भाग—V

## Language—II / भाषा—II

## Marathi / मराठी

परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121–150)** यांची उत्तरे द्यावीत.

***सूचना*** : योग्य पर्यायाची निवड करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या (प्रश्न क्रमांक **121** ते **135**) :

**121.** प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची उच्चारण क्षमता आणि श्रवण क्षमता वाढविण्यासाठी पुढीलपैकी कोणती उपाययोजना उपयुक्त ठरेल?

(1) गोष्ट सांगणे व मजकूर सांगून लिहायला लावणे

(2) कविता म्हणणे आणि भाषा प्रयोगशाळेचा वापर करायला लावणे

(3) अभिनय करण्यास आणि बातम्यांचे वाचन करण्यास सांगणे

(4) अभिनय आणि संभाषण करण्यास लावणे

**122.** भाषा शिक्षणात उपचारात्मक शिक्षणाचे उद्दिष्ट काय असते?

(1) विद्यार्थ्यांच्या प्राथमिक चुका दुरुस्त करणे

(2) माहिती किंवा ज्ञान या संदर्भात होणा-या चुका सुधारणे

(3) विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ करणे

(4) वरील सर्व

**123.** भाषेची सर्वसामान्य समज तपासून पाहण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रश्न अधिक उपयुक्त ठरतील?

(1) अतिलघुत्तरी प्रश्न

(2) दीर्घोत्तरी प्रश्न

(3) निबंधवजा प्रश्न

(4) वस्तुनिष्ठ/बहुविकल्पीय प्रश्न

**124.** ‘‘मुले भाषा शिकण्याच्या नैसर्गिक क्षमतेसह जन्माला येतात.’’ हे विधान कुणाचे?

(1) जीन पीगेट (Jean Piaget)

(2) चॉमस्की (Chowmsky)

(3) व्यगोस्की (Vygostky)

(4) पावलोव (Pavlov)

**125.** हिंदी भाषक प्रदेशातील एक मुलगी तुमच्या प्रदेशात येते. तुमची भाषा बोलताना ती चुका करते. एक शिक्षक या नात्याने तुम्हाला पुढीलपैकी कोणते विधान योग्य वाटते?

(1) तिने केलेल्या चुका वारंवार निदर्शनास आणून देणे

(2) तिला भाषा वापरण्याची जादा संधी उपलब्ध करुन देणे

(3) तिला रोज अर्धा तास भाषेचा सराव करण्यास सांगणे

(4) भाषेच्या वापरात तिच्या मातृभाषेचा प्रभाव नाकारणे

**126.** पुढीलपैकी कोणती बाब साध्य करण्यासाठी भाषा शिकणे हे गरजेचे नाही?

(1) जीवनाचे विविध टप्पे समजून घेण्यासाठी

(2) भाषा आकलनासाठी

(3) अंतर्मनाचा आवाज ऐकव्या-सांगण्यासाठी

(4) जीवनाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी

www.prepp.in

**127.** भाषेच्या संदर्भात निबंधवजा चाचणीचा पुढीलपैकी कोणता फायदा संभवतो?

(1) मुलाला त्याचे स्वतःचे विचार योग्यरित्या लिहिता येत आहे की नाही, हे तपासता येते

(2) विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी मोजके प्रश्न तयार करण्यात मदत होते

(3) विद्यार्थ्यांना मोजकेच प्रश्न सोडवावे लागतात त्यामुळे शिक्षणाचा वेळ वाचतो

(4) असे केल्याने संपूर्ण अभ्यासक्रमाला व्यापून घेता येते

**128.** विशिष्ट क्षमता असलेल्या मुलांना लेखन कौशल्याच्या सरावासाठी पुढीलपैकी कोणती गोष्ट आवश्यक असते?

(1) विचारांची अस्खलता

(2) प्रतीकात्मक भाषेचा वापर

(3) योग्य शब्दावलीचा वापर

(4) सुंदर अक्षरे

**129.** भाषेच्या सतत आणि व्यापक मूल्यांकनासाठी पुढीलपैकी कोणत्या गोष्टीवर भर दिला गेला पाहिजे?

(1) योग्य शब्दसंग्रह

(2) प्रकल्प कार्य

(3) योग्य उच्चारण

(4) वेगवेगळ्या संदर्भात भाषेला वापरण्याची क्षमता

Prepp
Your Personal Exams Gu

**130.** बहुभाषकता म्हणजे

(1) भाषा शिक्षणात अडथळा

(2) भाषा संसाधनांसाठी धोकादायक

(3) भाषा शिक्षणाचे एक महत्वाचे साधन

(4) भाषा शिकण्यात अडथळा निर्माण करते

**131.** भाषेचे प्राथमिक रुप म्हणजे

(1) संकेत भाषा

(2) व्याकरण

(3) लिखित भाषा

(4) मौखिक भाषा

**132.** प्राथमिक पातळीवरच्या शिक्षणात कविता आणि कथा यांच्यातील कोणती बाब तुम्हाला महत्वाची वाटते?

(1) ती मूल्य शिक्षण देणारी असली पाहिजे

(2) कविता किंवा कथा ही शब्दसंग्रहाच्या दृष्टीने समृद्ध असली पाहिजे

(3) महत्वाची नावे आणि उदाहरणे पुनःपुन्हा आली पाहिजेत

(4) कथा/कविता या महत्वाच्या लेखकांच्या असल्या पाहिजेत

Prepp Your Personal Exams Guide

**133.** भाषा शिकवताना व्याकरण शिकविल्याने पुढीलपैकी कोणती क्षमता सुधारते?

www.prepp.in

(1) अचूकता

(2) भाषेतील ओघ

(3) संख्या गणन

(4) साक्षरता

**134.** लेखन परंपरेत पुढीलपैकी कोणती बाब समाविष्ट असते?

(1) कथा विचार

(2) कल्पकता

(3) योग्य विरामचिन्हांचा वापर

(4) उत्तम शब्द संग्रह

**135.** भाषेचे मूल्यमापन करताना पुढीलपैकी कोणेत उद्दिष्ट असावे?

(1) विद्यार्थ्यांच्या चुका शोधणे

(2) पुढल्या इयत्तेत जाण्यासाठी विद्यार्थ्याच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे

(3) विद्यार्थ्यांची कामगिरी तपासणे

(4) शिक्षणातील न्यूनता शोधणे व त्यावर उपाययोजना करणे

***सूचना*** : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक [illegible] साठी योग्य पर्यायाची निवड करा :

Prepp Your Personal Exams Guide

निसर्ग हा लोकसंस्कृतीमधील एक महत्वाचा घटक असतो. लोकसंस्कृतीतला माणूस निसर्गाशी जुळवून घेत आपले आयुष्य जगत असतो. निसर्गाचा सहवास, निसर्गाचे अनुकरण व निसर्गाची जगण्यासाठी मदत घेतल्याशिवाय या माणसांना गत्यंतर नसते. निसर्ग हा लोकमानसाचा रक्षक असतो, तो शिक्षक असतो, मार्गदर्शक असतो, प्रसंगी संहारकही बनतो. निसर्गाच्या लहरीशी स्वतःला जुळवून घेतच या लोकसंस्कृतीच्या माणसाला जगावे लागते. त्यामुळे लोकसंस्कृतीतल्या व्यक्तीला निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण असते. कोणत्या ठिकाणी विहीर खणल्यावर पाणी लागेल, कोणत्या वनस्पतीचा पाला व रस कोणत्या आजारासाठी वापरायचा, कोणत्या झाडाचे फळ कडू आहे; याचे ज्ञान लोकसंस्कृतीतल्या माणसांना अधिक असते. सारे आयुष्य जंगलात गेलेल्या आदिवासीला पावलांच्या ठशांवरून तो कुणाचा ठसा आहे, तो केव्हाचा आहे, त्या प्राण्याचे वय काय असावे इ. गोष्टींचे अचूक ज्ञान असते. हे सारे निसर्गाच्या सहवासातून व निरीक्षणातून प्राप्त झालेले असते. आणि त्यातूनच लोकसंस्कृतीची जडण-घडण होत असते. लोकसंस्कृतीचे सारे पूजाविधी निसर्गातल्या माती, दगड, पान, फूल, साल यांनी परिपूरित झालेले असतात.

सामुहिक जीवनशैली हा या संस्कृतीचा आणखी एक विशेष म्हणता येईल. शिकार करण्यापासून तो शेती करण्यापर्यंत, स्वसंरक्षणापासून तो सणसोहळ्यांपर्यंत सर्व बाबतीत लोकसंस्कृतीला सामूहिकतेचा आधार घ्यावा लागतो. याउलट नागर संस्कृतीतल्या समाजजीवनात सहजीवनाला फारसा वाव नसतो. असला तरी त्याचे प्रमाण कमी असते. शेतीची विविध

www.prepp.in

कामे करताना, पिकांची राखण करताना, निसर्गकोपाला सामोरे जाताना, एखादी विहीर खणताना, यात्रा-जत्रा, सण सोहळे, विवाहविधी साजरे करताना एकापेक्षा अधिक माणसांची गरज असते. म्हणूनच इथे सामूहिक जीवनाला आपोआपच महत्व प्राप्त झालेले असते. परस्परांच्या सहकार्याशिवाय कृषिजीवनात कुणाचे पान हलत नाही. माणूस हा जात्याच समूहप्रिय प्राणी असल्याने अभिजनांच्या संस्कृतीमध्येही सामूहिक जीवनाला तसे स्थान असते, यात शंका नाही.

लोकसंस्कृतीच्या जडण-घडणीमध्ये एक आणखी घटक आहे ज्याचा उल्लेख करावा लागतो. तो म्हणजे कृतज्ञतेच्या भावनेतून निर्माण होणारे विधी. भूमी आपल्या उपजीविकेसाठी धनधान्य देते, फुले, फळे देते. घर बांधताना भूमीची मदत घ्यावी लागते. घरासाठी लागणारे दगड, माती दुसरीकडून कुठून मिळणार? म्हणून भूमीचे उपकार फेडणारे विधी या संस्कृतीत अधिक प्रमाणात असेतात. भूमीतून भरपूर पीक यावे, आलेले पीक नीटपणे आपल्या पदरात पडावे यासाठी देवदेवतांची तुष्टी करणारे विधीही या लोकसंस्कृतीत अधिक प्रमाणात आढळतात. वृक्षपूजा, पशुपूजा ही तर आदिम संस्कृतीपासून चालत आलेली प्रथा आहे. त्यामागे कृतज्ञता हाच भाव होता.

**136.** संस्कृतीच्या कोणत्या प्रमुख वैशिष्ट्याची चर्चा लेखकाने केली आहे?

(1) कृषिजीवन

(2) सामूहिक जीवनशैली

(3) अभिजन संस्कृती

(4) पूजा विधी

**137.** उपकाराच्या जाणिवेतून लोकसंस्कृतीत कोणते विधी केले जातात?

prepp
Your Personal Exams Gu

(1) निसर्गाच्या विविध घटकांची पूजा

(2) निसर्गाचे अनुकरण

(3) विहीर खणणे

(4) धनधान्य अर्जित करणे

**138.** लेखकाच्या मते शहरी जीवनशैलीत कोणत्या गोष्टीला मोकळीक नसते?

(1) समूह जीवन

(2) आधुनिक जीवनशैली

(3) मनोरंजनाची साधने

(4) सहजीवनाची अपरिहार्यता

**139.** लोकसंस्कृतीतल्या माणसांना कोणत्या गोष्टीचे ज्ञान नसते?

(1) जमिनीत पाण्याची उपलब्धता

(2) वनस्पतीचे गुणधर्म

(3) प्राण्यांचे वय जाणणे

(4) अभिजन संस्कृती

**140.** प्रमाण लेखनाच्या दृष्टीने अचूक शब्द ओळखा

(1) आशिर्वाद

(2) आर्शिवाद

(3) आर्शीवाद

(4) आशीर्वाद

**141.** लोकमानसाच्या संदर्भान लेखकाने निसर्गाला कोणती उपमा दिली?

www.prepp.in

(1) मार्गदर्शक

(2) संरक्षक

(3) उपदेशक

(4) संहारक

**142.** लेखकाच्या मते लोकजीवनातील पूजाविधीत कोणती वस्तू असते?

(1) मिठाई

(2) धूप-दीप

(3) पानं-फुलं

(4) होम-हवन

**143.** 'गत्यंतर नसणे' म्हणजे नेमकं काय?

(1) विकल्प नसणे

(2) पर्याय उपलब्ध असणे

(3) गती नसणे

(4) वेगळी वाट सापडणे

***सूचना*** : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **144** ते **150** साठी योग्य पर्यायाची निवड करा :

Prepp
Your Personal Exams Guide

निसर्गात फुलझाडे, पक्षी आणि कटिक यांचे अनोखे नाते आहे. परागीभवनासाठी पक्षी आणि कीटकांची मदत होते. त्यासाठी झाडे गोड मकरंदाची फुले आपल्या उपकारकर्त्यांना देतात. मात्र हा खाऊ मिळवतानाच या मंडळींनी सोबत परागकण नक्की न्यावेत अशी फुलांचीही प्रामाणिक इच्छा असते. त्यासाठी ही फुलझाडे खात्रीशीर, प्रभावी युक्त्याही वापरतात.

माणसापेक्षा कितीतरी वेगवेगळ्या रंगच्छटा कीटक पाहू शकतात. मधमाश्यां-सारखे कीटक तर अतिनील प्रकाशातही सहज वावरू शकतात. त्याचा चांगला उपयोग डोंगरउतारावर, रस्त्याच्या कडेला फुलणारी छोटीशी पिवळी रानफुले करून घेतात. हीच पिवळी फुले मधमाश्यांना चक्क वेगळीच दिसतात. मधमाश्यांना अतिनील प्रकाशदृष्टीच्या देगणीमुळे या फुलांच्या पिवळ्या पाकळ्या पांढऱ्या दिसतात. तसेच, पाकळ्यांच्या कडांना व बाजूला निळसर जांभळा रंग दिसतो. पाकळ्यांच्या रंगातील बदल हा त्या फुलांनी, मधमाश्यांना संदेश देण्यासाठी वापरलेली छानशी युक्ती असते. यामुळे मधमाश्यांना मधुकोषाकडे अचूक जाण्याची योग्य दिशा सापडते. विशेष म्हणजे, या मार्गावरुन जाताना मधमाश्यांच्या शरीराला फुलातले परागकण हमखास चिकटतात. त्यामुळे परागीभवन खात्रीने होते.

'गिलीया' नावाची छोटी झुडुपे तर परागीभवन हमखास होण्यासाठी वेगळीच युक्ती लढवतात. ही झुडुपे त्यांच्या फुलांचा रंग ठराविक काळानंतर चक्क बदलतात. उन्हाळ्याच्या सुरूवातीला त्यांना गडद लाल, केशरी रंगांची भरपूर फुले

येतात. या लाल रंगाच्या फुलांकडे गुणगुणापक्षी आकर्षित होतात. विशेष म्हणजे या पक्ष्यांची चोच लांब व बाकदार असते. चोच मधापर्यंत नीट पोचण्यासाठी या फुलांच्या पाकळ्या एकमेकींशी जोडून उभट पेल्यासारखा आकार धारण करतात. पर्यायाने गुणगुणापक्षी मध चोखताना, चोचीजवळच्या भागांना परागकण चिकटतात व परागीभवनाचे काम फत्ते होते. उन्हाळा संपला की त्याच झाडांना पांढऱ्या रंगाची फुले येतात. ऋतू बदलल्याने गुणगुणापक्ष्यांनी स्थलांतर केलेले असते, पण पतंगांचे आगमन झालेले असते. हे विशिष्टप्रकारचे पतंग पांढऱ्या फुलांकडे आकर्षित होतात. मकरंद खाण्याच्या निमित्ताने फुलांना भेट देतात व परागीभवनास मदत करतात.

'एकमेका साहाय्य करू, अवघे जीवन जगू' अशा उदात्त विचारांनीच निसर्गातले हे घटक आपले अस्तित्त्व टिकवून आहेत.

**144.** उताऱ्यात लेखिकेने प्रामुख्याने कशाचे वर्णन केले अहे?

(1) फुलांची युक्ती
(2) कीटक
(3) प्रकाशदृष्टी
(4) रंगच्छटा

**145.** मधमाश्यांना मधुकोषाकडे जाण्याची वाट कोण दाखवतं?

(1) फुलांच्या पाकळ्या
(2) अतिनील प्रकाश
(3) कीटक
(4) पतंग

**146.** उपकारकर्त्यांना झाडे काय देतात?

(1) कीटक
(2) पतंग
(3) मकरंदाची फुले
(4) मधमाश्या

**147.** पुढील शब्दांतील विशेष नाम कोणते?

(1) फूल
(2) रंग
(3) कीटक
(4) गिलिया

**148.** मधमाश्यांना फुलांचे रंग वेगवेगळे कोणत्या कारणास्तव दिसतात?

(1) प्रकाशदृष्टीच्या देणगीमुळे
(2) परागकणांमुळे
(3) कीटकांमुळे
(4) ऋतु बदलामुळे

**149.** रंग बदलण्याची किमया फुले कशासाठी करतात?

(1) परागकणांसाठी
(2) संदेश देण्यासाठी
(3) डोंगर उतारासाठी
(4) अतिनील प्रकाशासाठी

**150.** निसर्ग घटकांचे कोणते वैशिष्ट्य लेखिकेने अधोरेखित केले आहे?

(1) मार्गदर्शन करण्याचे
(2) परस्परांना मदत करण्याचे
(3) रंग बदलण्याचे
(4) अतिनील प्रकाशाचे

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Gu

www.prepp.in

Your Personal Exams Gu

Your Personal Exam Guide

www.prepp.in

***खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :***

**1.** वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्नपत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

Prepp
Your Personal Exams Guide

**2.** प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या **चार** पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तर-पत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ काळे किंवा निळे बॉलपॉइन्ट पेन ने संपूर्ण भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

**3.** परीक्षार्थींनी उत्तर-पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर-पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

**4.** चाचणी-पुस्तिका आणि उत्तर-पत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तर-पत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

**5.** चाचणी-पुस्तिका/उत्तर-पत्रिका यांवर दिलेले कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

**6.** OMR उत्तर-पत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेशपत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

**7.** परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री (मुद्रित अथवा लिखित), कागदाचे तुकडे, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.

**8.** मोबाइल फोन, तार-रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

**9.** प्रत्येक परीक्षार्थीने त्याचे/तिचे प्रवेशपत्र पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

**10.** पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

**11.** कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तर-पत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर-पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.

**12.** इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

**13.** परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

**14.** चाचणी-पुस्तिका आणि उत्तर-पत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

**15.** **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तर-पत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे.** ***चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

www.prepp.in

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए **चार** विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉलपॉइंट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर-पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर-पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाजिरी-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर-पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्यसामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर-पत्र दिए बिना एवं हाजिरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाजिरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर-पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अँगूठे का निशान हाजिरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर-पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर-पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the **four** alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ballpoint Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the Examination Halls/Rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left-hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall/Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***